Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal


• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ११८ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२५ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# ११ दिवस उपवास करणाऱ्यांच्या थिअरीमध्ये फसू नका:तर आरक्षण सोडा हे संविधानही गेलं समजा

## प्रकाश आंबेडकरांचा नरेंद्र मोदींना टोला

**धाराशिव–**राज्यात ओबीसी आणि मराठा भांडण सुरू आहे. तुम्ही जी भूमिका घेतली की, ओबीसींचं ताट वेगळं आणि मराठ्यांचं ताट वेगळं हे आता राजकीय दृष्टीकोणातून मान्य झालं आहे. आता ते टिकवण्याचं राजकारण करावं लागेल. दोन महिन्यात लोकसभेच्या निवडणुका आहेत. लोकसभेत ओबीसींचे १२ ते १३ खासदार गेले नाहीत तर आरक्षण टिकवणं कठीण होणार, मग भुजबळांसारखी कितीही माणसं लढली तरी आपल्याला ठेंगाच मिळेल, असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला.यावेळी त्यांनी मोदींवर देखील निशाणा साधला. काही लोकांच्या उपवासाच्या थिअरीमध्ये फसू नका, असे आवाहन देखील त्यांनी केले. धाराशिव येथे आयोजित ओबीसी एल्गार मेळाव्यात वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी मोदींवर देखील जोरदार हल्लाबोल केला.

प्रकाश आबेडकर म्हणाले की, उद्याच्या निवडणुकीत काय काय वाटप केलं जाईल. तर कबाबचं वाटप केलं जाईल. शबाबचं वाटप केलं जाईल. आणि त्याबरोबर महात्मा गांधीही वाटप केला जाईल अशी परिस्थिती आहे. याला जर बळी पडला तर आरक्षण सोडा हे संविधानही गेलं म्हणून समजा.महात्मा फुले यांना जाऊन किती वर्षे झाली? १५० वर्षे तर झाली. आजही त्यांना शिव्या घातल्या जात आहे. आजही त्यांची निंदा नालस्ती केली जात आहे का? फुले दाम्पत्यांचा आजही चेष्टा केली जात आहे. का? तर या देशाची गुलामीची जी व्यवस्था होती. जाती प्रथेची व्यवस्था होती, स्त्री शिक्षणाविरोधी व्यवस्था होती ती उलथवून टाकण्याची त्यांनी सुरुवात केली. आणि बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून कायम स्टँम्प मारला. ही व्यवस्था परत येणार नाही याची तजवीज केली, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.महात्मा फुले असतील. शाहू महाराज असेल बाबासाहेब असतील यांच्याबद्दल आठवड्यातून दोन चार वेळा कायम विडंबन करणारं लिखाण छापून येतं याचं कारण इथली वर्णव्यवस्था जी होती, जात व्यवस्था होती ती उद्ध्वस्त झाली आणि समतेची व्यवस्था सुरू झाली. आज तीच लढाई पुन्हा सुरू झाली आहे. ज्यांना तुम्ही उद्ध्वस्त केलं, आज तेच पुन्हा म्हणत आहेत की आम्ही सत्तेत आलो तर संविधान बदलल्याशिवाय राहणार नाही, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.या संविधानामुळे काय झालं तर अठरा बलुतेदार आणि १२ बलुतेदार हा सत्तेत जाऊ लगला. त्याला ते बंद होतं. ते मोडलं ते शिवाजी महाराजांनी मोडलं. इतर कोणत्याही राजात ही ताकद नव्हती. त्यामुळे सामाजिक स्वातंत्र्य जोपर्यंत आहे, तोपर्यंत शिवाजी महाराज जिवंत राहतील. लोकांच्या मनात शिवाजी महाराज जिवंत राहतील. लोकांच्या विचारांमध्ये जिवंत राहतील. त्यामुळे ही व्यवस्था ठेवायची की नाही याचा निर्णय घ्यावा लागेल. त्यासाठी समाजव्यवस्थेत भांडण सुरू झालं आहे, असा दावा प्रकाश आंबेडकरांनी केला.प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टोला लगावला. कुणी तरी देवाची पूजा केली, ११ दिवस उपवास केला म्हणून तो फार चांगला माणूस झाला अजिबात नाही. ११ दिवस उपवास केला म्हणून फार मोठं पूण्य केलं असं अजिबात नाही. या थिअरीमध्ये फसू नका, असं आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या भाषणात केलं. अयोध्येत प्रभू श्रीरामांच्या मंदिराच्या लोकार्पणाच्या पार्श्वभूमीवर मोदींनी ११ दिवसांचा उपवास केला. याच मुद्द्यावरुन प्रकाश आंबेडकर यांनी मोदींना टोला लगावला.आताच्या काळात सत्तेचं केंद्र बदललं. आता भटजीकडे केंद्र राहिलं नाही. ते केंद्र आता निवडून आलेला आमदार आणि खासदार यांनी घेतलं. हे लक्षात घ्या. ओबीसींना आरक्षण मिळालेलं आहे. हे आरक्षण राहिलं पाहिजे, त्यातून ओबीसींचा उद्धार झाला पाहिजे, असं आधीचे वक्ते म्हणाले. वस्तुस्थितीला धरून आहे. नाही असं नाही. हे आरक्षण आपण वाचवणार कसं? हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. नुसतं वाचवायचं नाही तर आरक्षणातून लोकांचा विकास झाला पाहिजे हेही पाहिलं पाहिजे. विकास साधायचा असेल आणि आमदार, खासदार व्हायचं असेल तर सर्व प्रथम उमेदवारी मिळाली पाहिजे, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.



# भामरागड तालुक्यातील मन्नेराजाराम येथे भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे माजी आ.दिपक आत्राम यांच्या हस्ते उदघाटन

### ब्ल्यू स्टार स्पोर्ट्स मंडळ मन्नेराजाराम तर्फे भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे आयोजन

**भामरागड । प्रतिनिधी**

तालुक्यातील मन्नेराजाराम येथे ब्ल्यू स्टार स्पोर्ट्स मंडळ मन्नेराजाराम तर्फे भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे उदघाटन भारत राष्ट्र समितीचे नेते,आदिवासी विद्यार्थी संघाचे विभागीय अध्यक्ष व माजी आमदार दिपक आत्राम यांच्या हस्ते करण्यात आले .

या उदघाटन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून वारलु चांदेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस पाटील क्रीष्णा सिडाम,वेलगुर ग्रामपंचायत चे उपसरंच उमेश मोहुले,अनिल मडावी सभापती वि.कार्य.सहकारी संस्था,दशरथ चांदेकर सदस्य वि.कार्य.सहकारी संस्था सुरेश निलम,पोचाजी मडावी,नारायण कोंडागुले,ललीत पाथर,सिताराम पेंदाम, परशुराम झाडे, चंद्रय्याजी जुमडे,जुलेख शेख,अंकुश दुर्गे,प्रवीण रेषे सह आविस व बीआरएस चे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी माजी आमदार दिपक आत्राम यांनी क्रिकेट खेळाविषयी खेडाळु व नागरिकांना मोलाचे मार्गदर्शन केले.टेनिस बॉल क्रिकेट सामन्यासाठी प्रथम पुरस्कार माजी आमदार दिपकदादा आत्राम यांच्याकडून तर द्वितीय पुरस्कार माजी जि.प.सदस्या अनिता दिपक आत्राम यांच्या कडून असे एकूण दोन बक्षीस ठेवण्यात आले.ब्ल्यू स्टार स्पोर्ट्स मंडळ मन्नेराजाराम कडून आयोजित भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे उदघाटनीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शामराव झाडे यांनी मानले.या टेनिस बॉल सामन्याचे उदघाटनीय सोहळ्याला मन्नेराजाराम सह परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.सामन्याच्या यशस्वीतेसाठी शामराव झाडे,अजय झाडे,संजय आलाम, विनोद कोपर्ती,विक्की झाडे,लंकेश झाडे,सूरज कोंडागुर्ले,योगेश सेगाम,सिद्धार्थ झाडे, संजय हलदर सह मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# ब्रजधामात भागवत कथा ऐकायला उसळला जनसागर

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील श्री टॉकीज परिसराच्या मागे निर्मित विशाल ब्रजधाम येथे गोवत्स राधाकृष्णजी महाराज यांनी कथा वाचणं करताना ५ व्या दिवशी बाल कृष्ण लीला चा उल्लेख करत वर्णन केले की कशा प्रकारे नट खट बाल कृष्ण हे माखन चोरी करत, आपली बाल पणाची लीला दाखवत होते. ते पाहून सर्व गोपिका त्यांची तक्रार करण्यासाठी यशोदा माता कडे येत होत्या.परंतु बाल कृष्णाची तक्रारीमागे सर्व गोपीकांचा उद्देश फक्त बाल कृष्णाचे दर्शन करणे होता.जेथे जेथे राधा असतील तेथे तेथे गोपाल कृष्ण भगवान अवश्य उपस्थित होतात. भक्ती मध्ये एवढी शक्ती आहे की ईश्वर स्वतः कोणत्या न कोणत्या रूपात प्रकट होऊन भक्त मंडळीला दर्शन देतात आज अन्नकुट चे दर्शन मात्र ने प्रत्यक्ष ईश्वर चे दर्शन ची अनुभूती या ब्रजधाम मध्ये झाली. गोवत्स राधा कृष्ण महाराज ने मराठी मध्ये सुंदर भजन डग मग डग मग डोलत माझी नाव रे पंढरीचा पांडुरंग भिगी भीगी



नाव रे भजन प्रस्तुत करत उपस्थित सर्व कथा श्रवण करणाऱ्या भाविक भक्तांना भाव विभोर केले.आज प्रभू रामाची अयोध्या येथील मूर्ती ची प्राण प्रतिष्ठा ची झांकी मंचा वर साकार केली उपस्थित सर्व भाविक भक्तांनी आप आपल्या हातात दिवे घेऊन आरती केली. आरती नंतर सर्वांना प्रसाद वाटण्यात आले संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश्र्वरी मंडळाच्या सर्व लोकांनी अथक प्रयत्न केले.

# रेल्वे मार्गाच्या संबंधित केलेल्या प्रयत्नाला व पाठपुराव्याला अखेर यश

## खासदार अशोक नेते यांनी केली कामाची पाहणी

**गडचिरोली । प्रतिनिधी**

वडसा ते गडचिरोली या ५२ किलोमीटरच्या नवीन रेल्वे मार्गाच्या उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. खासदार अशोक नेते यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या या कामाला बुधवारी खा.नेते यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी रेल्वेच्या अभियंत्यांनी त्यांना झालेल्या कामाची माहिती दिली.




वडसा ते आरमोरी यादरम्यान वन्यजीवांची वर्दळ राहत असल्यामुळे या मार्गावर रेल्वेसाठी पुलाची उभारणी केली जाणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाची किंमत १०९६ कोटी वरून १८८८ कोटी रुपये झाली आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रत्येकी ५० टक्के वाट्यातून उभारल्या जात असलेल्या या रेल्वेमार्गाच्या पहिल्या टप्प्यात ३२२ कोटी रुपयांच्या खर्चातून उभारल्या जाणाऱ्या २० किमीच्या रेल्वेमार्गाच्या कामाला सुरुवात झाली. वडसा रेल्वे स्थानकापासून गडचिरोलीच्या दिशेने या कामाची सुरुवात करण्यात आली. गडचिरोली जिल्हा हा आदिवासी आकांक्षीत अविकसित जिल्हा म्हणून ओळख आहे.या जिल्ह्यात एकमेव वडसा( देसाईगंज) रेल्वे स्टेशन आहे.परंतु वडसा गडचिरोली पर्यंत बावन ५२ किलोमीटर पर्यंत रेल्वे मार्ग आणण्यासाठी, या देशाचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजी, व केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, विदर्भाच्या विकासासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात अग्रेसर असलेले विकास पुरूष केंद्रीयमंत्री नितिन गडकरी यांचे शतशा आभार.यासोबतच या कामात राज्य सरकारचा ५०% यात वाटा असल्याने विकास कामात मौलाची भूमिका बजावणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन वितमंत्री लोकनेते, विकास पुरूष यांची ही विकासासंबंधित मौलाची भूमिका आहे यासाठी सर्वांचे अभिनंदन व आभार मानीत रेल्वेच्या कामाची पाहणी केल्यानंतर खासदार अशोक नेते यांनी आनंद व्यक्त करत आपल्या भावना व्यक्त केल्या.खा. अशोक नेते यांनी या कामाची गती पाहून समाधान व्यक्त केले. या कामासाठी आवश्यक असलेला निधी केंद्र आणि राज्य सरकारकडून वेळोवेळी मिळवून देण्यासाठी मी कटीबद्ध आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले हे काम लवकरात लवकर पूर्ण होऊन गडचिरोली आणि पुढे छत्तीसगड, तेलंगणापर्यंत या रेल्वे मार्गाचा विस्तार केला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# राष्ट्रवादीची अंतर्गत निवडणूक कागदपत्रे कपाटामधून गायब-जितेंद्र आव्हाड

**मुंबई–**राष्ट्रवादी काँग्रेसची २०२२ मध्ये अंतर्गत निवडणूक झाली. त्याची कागदपत्रे व पुरावे कपाटातून गायब झाल्याची खळबळजनक माहिती शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस बंडखोर आमदारांच्या अपात्रतेची सुनावणी मंगळवारी (२३ जानेवारी) विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांच्यासमोर झाली. त्यात त्यांनी ही माहिती दिली.आव्हाडांनी 'जय महाराष्ट्र' असा नारा देत आपले म्हणणे नोंदवण्यास सुरुवात केली. अजित पवार गटाचे वकील तुळजापूरकर यांनी त्यांना विचारले की, जुलै २०२२ ते सप्टेंबर २०२२ दरम्यान पक्षांतर्गत निवडणुका झाल्या आहेत का? त्यावर शरद पवार गटाचे वकील, आव्हाडांनी आक्षेप घेतला. हा प्रश्न याचिकेशी संबंधित नसल्याचे सांगितले. पक्षात सरचिटणीसपदी कार्यरत असून निवडणूक समितीच्या कार्यकारिणीचे स्थायी सदस्य असल्याचे ते म्हणाले. त्यावर विधानसभा अध्यक्षांनी पक्षांतर्गत निवडणुका झाल्या का. अजित पवार गटाच्या वकिलांनी पक्षात शिस्तभंग समिती कशी स्थापन झाली, असा सवाल केला.आव्हाडांच्या उलटतपासणीत अजित पवारांसोबत बंडाच्या वेळी किती आमदार होते, हा मुद्दाही विशेषतः समोर आला. आव्हाड म्हणाले की, अजित पवारांसोबत ८ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामुळे त्या वेळी त्यांच्यासोबत केवळ ९ आमदार होते. मात्र, जेव्हा आम्हाला निवडणूक आयुक्तांचे पत्र मिळाले तेव्हा त्यांच्यासोबत ३३ ते ३५ आमदार असल्याची माहिती मिळाली.

॥ चौथे पुण्यस्मरण ॥



स्वर्गीय सौ.पुष्पलता मारोती घूमे

अपार कष्ट सोसले, स्वसुख भोगायचे राहून गेले,
थोरा मोठ्यांना जीव लावला, सर्वांच्या कल्याणासाठी देह झिजविला,
आता उरली नाही साथ आम्हाला, वाट पाहतो तुमची यावे पुन्हा जन्माला

• भावपूर्ण श्रद्धांजली.. •

शोकाकुल - समस्त घुमे परिवार

# ते आले,त्यांनी पाहिले अन् जिंकले...

**ते आले. व्यासपीठावर विराजमान झाले. त्यांनी पाहिले आणि आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत सर्वांना जिंकले. प्रारंभी 'युवक आणि युवकांची कर्तव्ये' या विषयावर बोलत त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व उपस्थितांना समजवून सांगत स्पर्धा परीक्षा यशस्वी होण्याचा गुरुमंत्रही दिला. कोण होते हे विशेष अतिथी? तर हे होते चंद्रपूर जिल्ह्यातील परिविक्षाधीन जिल्हाधिकारी श्री. रणजित यादव (ख-ड). सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भद्रावती. त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील अगदी शेवटच्या टोकावर असलेल्या मुधोली या आदिवासीबहुल दुर्गम भागातील गावांत येऊन राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास भेट देत विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. 'याची देही याची डोळा' दस्तूरखुद्द जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष येऊन मार्गदर्शन केल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला.**




मागील १८ जानेवारीपासून २४ जानेवारीपर्यंत भद्रावती तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या मुधोली या जंगलव्याप्त आदिवासीबहुल गावात विवेकानंद महाविद्यालय भद्रावती येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात जवळपास सव्वाशे स्वयंसेवक स्वयंसेविकांनी उपस्थित राहून ग्रामीण भागातील निवासी जीवनाचा आनंद लुटला. समारोपीय कार्यक्रमाच्या दिवशी कुणीतरी विद्यार्थ्यांना सांगितले की आज आपल्याला मार्गदर्शन करायला चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी येणार आहेत. खुद्द जिल्हाधिकारी भेटायला येणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. त्यांच्यात उत्साह संचारला होता. महाविद्यालयीन जीवन शिकत असताना अनेक विद्यार्थी विविध प्रकारची रंगीबेरंगी स्वप्ने बघत असतात. कुणाला सिनेमातील अभिनेत्यांचे आकर्षण असते. कुणाला इतिहासातील थोर व्यक्तींचे आकर्षण असते. कुणाला विशिष्ट साहित्यिक आवडतो तर कुणाला विशिष्ट राजकीय व्यक्ती पसंत असतो. अलिकडे अनेकांना प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आकर्षण असते. कुणाला कुठले आकर्षण असेल सांगता येत नाही. अलीकडे नोकरीविषयक स्पर्धा लक्षात घेता प्रशासकीय सेवेचे आकर्षण निर्माण झालेले आहे. बरेचसे विद्यार्थी महाविद्यालयांमध्ये स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आपली नोकरीविषयक विविध स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यासाठी ते विविध प्रकारच्या पेपरची तयारी करतात. मुलाखतीची तयारी करतात. परंतु त्यांचं ते सगळं महाभारतातील द्रोणाचार्यासारखं असतं. प्रत्यक्ष गुरु उपलब्ध नसताना केवळ पुतळा उभारून जसं द्रोणाचार्याने धनुर्विद्येचे शिक्षण पूर्ण केले. तसेच बरेच विद्यार्थी ग्रामीण भागामध्ये केवळ पुस्तकांच्या भरोशावर स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी होण्याची स्वप्ने बघत असतात. अशी स्वप्न बघणाऱ्यांना जेव्हा प्रत्यक्ष ती परीक्षा पास होऊन कर्तव्यावर रूजू झालेले अधिकारी प्रत्यक्ष भेटीला येतात. तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावर उरत नाही.जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते. असेच काहीसे आज राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील विद्यार्थ्यांचे झाले. आज समारोपीय कार्यक्रमासाठी भद्रावतीचे तहसीलदार अनिकेत सोनवणे जिल्हाधिकाऱ्यांना घेऊन येणार ही वार्ता बघताबघता सर्व शिबिरार्थीच्या कानावर पोचली. आणि सगळेच सुखावले. मुख्य पाहुण्यांचे भाषण ऐकण्यासाठी आसुसले. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. त्यांची जिल्हाधिकाऱ्यांचे भाषण ऐकण्यासाठी लगबग सुरू झाली. विद्यार्थीदशेमध्ये जिल्हाधिकारी बघायला मिळणे हे अहोभाग्य असे म्हणता येईल. कारण जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीसप्रमुख ही पदेच अशी आहेत की तिथे सर्वसामान्य माणसाचे काही चालत नाही. त्यांच्यापर्यंत पोहोचणेच अशक्य असते. त्यामुळे त्यांच्याबद्दल सर्वसामान्यांच्या मनात एक प्रकारचे कुतूहल असते. जिल्हाधिकारी दिसायला कसे असतील? जिल्हाधिकारी बोलायला कसे असतील? आज त्यांचे कुतूहल संपणार होते.




त्यांना प्रत्यक्ष जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधता येणार होता.अभ्यास करताना येणाऱ्या विविध शंका आणि प्रश्न आहे त्याचे निरसन करून घेता येणार होते. नियोजित कार्यक्रमस्थळी भद्रावतीचे तहसीलदार अनिकेत सोनवणे साहेबांनी जिल्हाधिकाऱ्यांना आणले. विद्यार्थ्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात होताच जिल्हाधिकारी आले. व्यासपीठावर विराजमान झाले. त्यांनी उपस्थितांकडे बघितले आणि उपस्थितांना जिंकले. सर्वांच्या चेहऱ्यावरील आनंद आपले शिबिरामधील वास्तव्य कृतार्थ झाल्याचे सांगत होते. प्रत्यक्ष जिल्हाधिकाऱ्यांनी भाषणाला सुरुवात केल्यानंतर त्यांनी युवकांचे कर्तव्ये, राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगत आणि प्रशासकीय परीक्षा कशी पास व्हावी यासंदर्भात विद्यार्थ्यांना यशस्वी होण्याचा गुरुमंत्र दिला. विद्यार्थ्यांनीही एखाद्या चातकाप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांचे बोलणे कानात प्राण आणून ऐकले. आपणही जिल्हाधिकारी होऊ शकतो हा आत्मविश्वास निर्माण झाला.काहींच्या मनात प्रश्न निर्माण झाले. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना थेट परीक्षाविषयक प्रश्न विचारून आपली जिज्ञासा तृप्त केली. जिल्हाधिकाऱ्यांनीही आपण काही विशेष अधिकारी आहोत याचा मुलाहिजा न बाळगता अतिशय साधेपणाने आणि समर्पक उत्तरे देऊन विद्यार्थ्यांना प्रेरित केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या भाषणाने आणि सहवासाने विद्यार्थ्यांच्या मनात शिबिरात आल्याची कृतार्थ भावना होतीच. काही विद्यार्थ्यांनी धाडस करीत त्यांना आपल्या सोबत फोटो काढण्यासाठी विनंती केली. जिल्हाधिकारी साहेबांनी विद्यार्थ्यांच्या इच्छेला मान देऊन सर्वांसोबत सवडीने फोटो काढून घेतले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना मनमोकळेपणाने उत्तरे दिली. गावातील समस्या पुढाऱ्यांमार्फत समजून घेतल्या. विद्यार्थ्यांनीही जिल्हाधिकाऱ्यांची कार्यप्रणाली अतिशय जवळून बघितली. अनेकांना त्यापासून प्रेरणा मिळाली. जिल्हाधिकारी कसे असतात हे प्रत्यक्ष जवळून बघता आणि अनुभवता आले. कार्यक्रम संपल्यानंतर अनेकांनी आपल्यालाही जिल्हाधिकारी व्हायचे आहे असे आपले स्वप्न बोलून दाखविले. असे म्हणतात की परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचेही सोने होते. विद्यार्थी जीवनामध्ये प्रेरणा महत्त्वाची असते. प्रेरणास्थळांचा सहवासही महत्त्वाचा असतो. महाविद्यालयात शिकणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांमधील हाताच्या बोटावर मोजता येणारे विद्यार्थीच आयुष्यामध्ये घडत असतात. अशा विद्यार्थ्यांसाठी अशी अधूनमधून मिळणारे आदर्श हे लढण्याची, जगण्याची, कार्य करण्याची प्रेरणा देत असतात. त्यांचा उत्साहात द्विगुणित करत असतात. काल खेड्यापाड्यातील तरुणांनी जिल्हाधिकारी स्वतः डोळ्यांनी बघितले, त्यांचे बोलणे ऐकले, विचार मार्गदर्शन ऐकले ही त्याच्यासाठी अतिशय आनंदाची पर्वणी होती. काही वेळ ते विद्यार्थ्यांसोबत थांबले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते प्रेरणा देणारे होते. शिबिरातून भावी प्रशासकीय अधिकारी निर्माण होण्याची प्रेरणा देणारे होते. प्रशासकीय अधिकारी हे पद अतिशय सेवाभावी असते. त्यातून सार्वजनिक सेवा तर करता येते परंतु अनेकांना मार्गदर्शन देऊन प्रशासकीय अधिकारी घडवता येते. अनेकांचा प्रशासकीय सेवेकडे अलीकडे कल मोठ्या प्रमाणामध्ये वाढलेला आहे. राजकीय क्षेत्रात सगळीकडे निराशावादी वातावरण असताना राजकीय अस्थिरता असताना जिल्हाधिकाऱ्यांनी मुधोली गावात दिलेली भेट सर्वसामान्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अतिशय प्रेरणा देणारी होती. यावेळी त्यांच्या सोबतीला इतरही प्रशासकीय अधिकारी आले होते.विशेषत: भदरावतीचे तहसीलदार अनिकेत सोनवणे, नायब तहसीलदार राहुल राऊत व भद्रावतीचे भद्रावती पंचायत समितीचे संवर्ग विकास अधिकारी आशुतोष सपकाळ प्रामुख्याने उपस्थित होते.

# प्रत्येक मत मौल्यवान मतदार व्हा सुजान!

**जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताचा सातत्याने गौरव होत असतो. त्या लोकशाहीचा महत्त्वाचा घटक म्हणजे मतदार होय. म्हणून प्रजासत्ताक दिन म्हणजेच २६ जानेवारीच्या पूर्वसंध्येला राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो. त्याचे महत्त्व जाणून घ्या श्री. एन. के. कुमार जी. गुरूजींच्या या लेखातून... संपादक.**

आपला भारतदेश १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. देश १५ ऑगस्टला स्वतंत्र झाला असला तरी २६ जानेवारीपासून भारताचे लोकशाही पर्व खऱ्या अर्थाने सुरू झाले. भारत या दिवशी लोकशाही, सार्वभौम, प्रजासत्ताक- गणराज्य बनला. त्यासाठी तो दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताचा सातत्याने गौरव होत असतो. त्या लोकशाहीचा महत्त्वाचा घटक म्हणजे मतदार होय. म्हणून प्रजासत्ताक दिन म्हणजेच २६ जानेवारीच्या पूर्वसंध्येला राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो. लोकशाहीमध्ये प्रत्येक मत मौल्यवान आहे. एका-एका मताने येथे विरोधक जिंकतात आणि सत्ताधीश कोसळतात. म्हणूनच अरुणाचल प्रदेशमध्ये एका मतदारसंघात असेही एक मतदान केंद्र उभे करण्यात आले होते. जेथे फक्त एकाच मतदाराची नोंद करण्यात आली आहे. हयुलियांग मतदारसंघातील हे केंद्र देशातील सर्वात छोटे मतदार केंद्र होते. अरुणाचल प्रदेशच्या पूर्व भागात हयुलियांग मतदारसंघ आहे. या मतदारसंघात अत्यंत तुरळक मतदार आढळतात. यातील सर्वात पूर्वेकडील मालोगाम मतदार केंद्रात मागच्या लोकसभेला केवळ दोन मतदारांची नावे नोंदवण्यात आली होती. यावेळी मात्र एकाच मतदाराचे नाव नोंदवण्यात आले. हे मतदान केंद्र सर्वात छोटे केंद्र ठरले होते. पण एका मतदारासाठी देखील येथे मतदान घ्यावेच लागेल, अशी सूचना निवडणूक आयोगाने स्थानिक प्रशासनाला केली होती.

अधिकाधिक तरुण मतदारांना राजकीय प्रक्रियेत भाग घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी भारत सरकार दरवर्षी २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करते. दि.२५ जानेवारी १९५० हा भारतीय निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस होता. दरवर्षी राष्ट्रीय मतदार दिन नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या उपस्थितीत साजरा केला जातो. स्वागत भाषणातून कार्यक्रम सुरू होतो, लोकनृत्य, नाटक, संगीत, वेगवेगळ्या थीमवर चित्रकला स्पर्धा इत्यादी अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. भारत हा जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश आहे. प्रत्येक नागरिकाला मतदानाचे मूलभूत अधिकार आहेत. देशाच्या नेतृत्वात, सामान्य लोकांच्या समस्या सोडवण्यास, बदल घडवून आणण्यास सक्षम वाटतो, असा नेता निवडीचा प्रत्येक मतदाराला अधिकार आहे. मतदारांचा निवडणूक प्रक्रियेत प्रभावी सहभाग वाढवणे आवश्यक आहे. यापूर्वी मतदारांचे पात्रता वय २१ वर्षे होते; परंतु १९८८मध्ये ते कमी करून १८ वर्षे केले गेले. भारतीय तरुणांची राजकीय जागरूकता पातळी प्रौढांपेक्षा खूपच जास्त आहे आणि येत्या काळात ते देशातील राजकीय बदलांमध्ये सर्वांत मोठे योगदान देतील. भारत हा युवकांचा देश आहे व त्यामुळे युवापिढीशी सहभागासाठी संवाद अत्यावश्यक आहे. येथेच नवतंत्रज्ञान



आपल्याला मदत करू शकते. आधुनिक स्मार्ट तंत्रज्ञान आता प्रत्येक मतदाराच्या हाती आले आहे. त्यामुळे सभा घरबसल्या फोनवरच ऐकता येतात. त्यासाठी सभास्थानी जायची गरज नाही. यापुढची पायरी गाठण्याची वेळ आता आली आहे. मतदान केंद्रात न जाता मोबाइल अथवा संगणकावर ऑनलाइन व्होटिंग निवडणूक आयोगाने एक पर्याय म्हणून स्वीकारले पाहिजे. अनेक मतदारांना प्रत्यक्ष मतदान अनेक सबळ कारणाने इच्छा असूनही करता येत नाही. अशा मतदारांना हा पर्याय मिळेल व त्यामुळे मतदानाची टक्केवारी नक्कीच वाढेल. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, एस्टोनिया, फिनलँड, फ्रान्स आणि नॉर्वे या देशांनी याचे प्रयोग केले आहेत. व्होटर हेल्पलाइन ॲपदेखील सुरू करण्यात आले आहे. मतदार यादीतील मतदारांची नावे पडताळणीस मतदारांना ते वापरता येते. प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी त्यांच्यासाठी निवडणूक छायाचित्र ओळखपत्रांचा वापर केल्याने अनेक गैरप्रकार टळत आहेत. मतदारसंघातील डि-डुप्लिकेशन सॉफ्टवेअरचा वापर करून मतदार यादीतील एकाच नावाच्या विविध व्यक्तींची ओळखपत्राद्वारे खातरजमा केली आहे. पूर्वी अनेक मतदारसंघांत समान नाव असण्यामुळे गैरप्रकार होत असत. मुख्यालयाशी सीसीटीव्ही जोडून रेकॉर्ड करणे, ड्रोन कॅमेरे मतदान केंद्रावर टेहेळणीसाठी वापरावे व त्या माहितीचे वेब ॲनॅलिटीक्सद्वारे पृथक्करण करून फक्त अपवादात्मक विशेष परिस्थितीचे नियंत्रण करता येणे शक्य आहे. निवडणुकांदरम्यान नागरिकांना आदर्श आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाचा अहवाल देण्यासाठी सिव्हिजिल हे एक अभिनव मोबाइल ॲप आहे. कुठलाही नागरिक ही सेवा वापरू शकतो. या ॲपचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ स्थान ग्रहणासह थेट फोटो-व्हिडीओला अनुमती देते. कुठल्याही प्रकारची आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याची घटना पाहिल्यानंतर काही मिनिटांतच आयोगाला कळू शकते व त्यावर गरज पडल्यास सुधारात्मक कृती करता येऊ शकते. पूर्वी ही प्रक्रिया खूपच वेळखाऊ होती. आपल्याकडे सन २०१४ला झालेल्या निवडणुकीपासून सोशल मीडियाचे महत्त्व सर्वच राजकीय व्यक्ती आणि पक्षांच्या ध्यानात आले. या संवादमाध्यमाचा वापर खूप वाढला आहे. सतत बदलत्या राजकारणाला समजून घेताना सोशल मीडियाला वगळून पुढे जाता येत नाही. व्हॉट्सॲप, फेसबुक, ट्विटर, थ्रीडी होलोग्राम, इंटरॲक्टिव व्हॉइस रिस्पॉन्स आणि यूट्यूबचा वापर सर्व पक्ष आणि उमेदवार कमीअधिक प्रमाणात करीत आहेत. त्याचा युवा मतदारांवर सकारात्मक परिणाम होत आहे. सोशल मीडिया सामाजिक आहे आणि त्यानुसारच त्याची शक्ती वापरली जावी. जर कोणी प्रतिक्रिया दिली किंवा प्रतिसाद दिला तर हे एखाद्या नागरिकाचे डिजिटल पत्र समजून ऐकले पाहिजे. युवा मतदारांची वाढलेली जाणीव, जात, धर्म आणि वक्तृत्व यांच्या वक्तव्याच्या पलीकडे जाण्याची शक्यता आहे. युवा पिढीचे प्रश्न साधे आहेत. रोजगार, राहणीमान, पायाभूत सुविधा, सुरक्षा यांसारख्या बाबी आता कुठलाही पक्ष दुर्लक्षित करू शकत नाही.

लोकशाहीत सर्वाधिक महत्त्वाची गरज आहे ती सहभागाची! दुर्दैवाने अनेकांना असे वाटते की, जनता आणि लोकप्रतिनिधी हे दोन परस्परांपेक्षा भिन्न आणि संपूर्णत: स्वतंत्र असे घटक आहेत. वास्तवात लोकशाहीच काय? परंतु कोणतीही राज्यपद्धती ही नागरिकांच्या सहभागाशिवाय चालू शकत नाही. हा सहभाग निव्वळ मत देणे आणि व्यक्त करणे एव्हढ्या पुरता मर्यादित नाही. स्थानिक नगरसेवकाकडे महत्त्वाचे प्रश्न नेण्यापासून ते प्रसंगी शासन निर्णयाविरुद्ध आंदोलनात सहभागी होण्यापर्यंत आपल्या सर्वांना लोकशाहीत नियमित सामील व्हायला हवे. आजची आधुनिक संपर्क माध्यमे हे आपल्याला गवसलेले नवे वाहन आहे. त्यातल्या प्रवासाचे गूज आपण सारेच आत्ता अनुभवत आहोत. तुम्ही निवडून दिलेले नेते- सरकार हे तुमच्या देशाची उन्नती साधक ठरेल. ते पोटभरू आपमतलबी व अधोगतीकारक ठरू नये. म्हणून भानावर राहून मतदान केले पाहिजे, उमेदवाराच्या कोणत्याही आमिषाला बळी न पडता! घोटभर दारू, पार्टी, धोतर-लुगडे हे क्षणाची किंवा काही महिन्यांचीच तुमची गरज भागवेल, मात्र पाच वर्षापर्यंत विकास शून्यावस्थेत राहून उलट भकासच भकास होत जाईल, म्हणून मतदार राजा, या दिवसाची मनोमन आठवण ठेऊन सावधपणे मतदान कर, मात्र अवश्यच कर!

!! राष्ट्रीय मतदार दिन चिरायू होवो !!

**श्री. एन. के.
कुमार जी. (से.नि.प्रा.शिक्षक).
द्वारा- श्री गुरूदेव
प्रार्थना मंदिराजवळ.
मु. रामनगर वॉर्ड
नं.२०, गडचिरोली.
जि. गडचिरोली,
चलभाष- ७७७५०४१०८६.**

# संधी असताना राजकारणापासून दूर राहण्याचे काळुंगेचे संकेत



**मंगळवेढा :** राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार व काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांना मानणाऱ्या मंगळवेढ्यातील शिवाजीराव काळुंगे आपल्या आयुष्यात केलेले शैक्षणिक आर्थिक व सामाजिक कार्य दाखवण्यात यशस्वी ठरले असले तरी भविष्यात मात्र राजकारणापासून दूर राहण्याचे संकेत दिले.राजकारणाबरोबर मंगळवेढ्यातील वेगवेगळ्या सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक,दुष्काळ प्रश्नात सहभाग नोंदवत शिवाजीराव काळुंगे व शोभा काळुंगे यांनी धनश्री पतसंस्थेची स्थापना केली. या पतसंस्थेच्या माध्यमातून तालुक्याची आर्थिक घडी बसवत कार्यक्षेत्रातील अनेक बेरोजगारांना, व्यवसायासाठी, शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज देऊन बँकेची वाटचाल सुरू ठेवली. या दोघा पती-पत्नींनी कर्जदार, ठेवीदाराचा मोठा विश्वास संपादन केल्यामुळे दीड हजार कोटींच्या ठेवी या संस्थेने पार केल्या.धनश्रीच्या माध्यमातून जिल्ह्यातील साखर कारखानदारी जिवंत ठेवण्यासाठी सर्वच कारखानदारांनाही अर्थसहाय्य केल्यामुळे मा.आमदार प्रशांत परिचारक यांनी एका कार्यक्रमात शिवाजीराव काळुंगे यांनी कारखानदाराला मदत केली नसती तर शेतकऱ्या प्रमाणे कारखानदारांनाही आत्महत्या कराव्या लागल्या असता असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एवढे प्रभावी काम करणाऱ्या शिवाजीराव काळुंगेना राजकीय संघर्ष करावा लागला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसशी एकनिष्ठ राहिल्याबद्दल पक्षाने त्यांना बी फार्म दिल्यामुळे त्यांनी विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला मात्र ऐनवेळी पक्षाने त्यांची साथ सोडल्यामुळे त्यांना एकाची लढत द्यावी लागली.त्यामुळे त्यांनी गेल्या चार वर्षे राजकीय वातावरणापासून थोडे लांब राहण्याचा निर्णय घेतला परंतु जिल्ह्यातील साखर कारखानदारी जतन करण्यात ज्याप्रमाणे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार व स्व. सुधाकर परिचारक यांनी योगदान दिले त्याप्रमाणे सध्या कारखानदारी टिकवून ठेवण्यात शिवाजीराव काळुंगे यांनी योगदान दिले.जिल्ह्यातील कारखानदाराला केलेल्या आर्थिक मदत व त्यांचा व्याप पाहता त्यांची राजकीय बस्तान देखील अलीकडच्या काळात मजबूत झाले आहे अशा परिस्थितीत धनश्री पतसंस्थेचा रौप्य महोत्सव, धनश्री मल्टीस्टेटची तपपृती व शिवाजी काळुंगे यांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमाच्या निमित्ताने राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे एकाच व्यासपीठ आहेत.जिल्ह्यातील साखर उद्योगाचे पुनर्वसन करणारे शिवाजीराव काळुंगे यांचे राजकीय पुनर्वसन विधानपरिषदेत हे दोन्ही नेते करणार का ? त्याचे सर्वच क्षेत्रातील काम पाहता सर्वच राजकीय पक्षाशी त्यांचे असलेले संबंधही चांगले आहेत त्यामुळे त्यांना महायुतीकडून सुद्धा ऑफर येण्याची शक्यतेची चर्चा देखील या निमित्ताने मंगळवेढ्यातील राजकीय वर्तुळात झाली.धनश्री परिवारातील सदस्यांना शिवाजीराव काळुंगे यांना विधानसभा किंवा विधानपरिषद मध्ये जाण्याची संधी मिळावी अशी अपेक्षा असतानाच दस्तुरखुद्द शिवाजीराव काळुंगे यांनीच आपण राजकीय वर्तुळातून दूर असल्याचे सांगून या चर्चेला पूर्णविराम दिला असला तरी भविष्यात जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मात्र स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करण्यात ते यशस्वी ठरले असते.

# महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने हळदी कुंकू स्नेहमिलन महिला मेळावा सपन्न

**मूल । प्रतिनिधी**

मकरसंक्रांतीच्या निमित्ताने महिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मूल तर्फे हळदी कुंकू आणि स्नेह मिलन मेळावा आयोजित करण्यात आला.सदर मेळाव्याचे उद्घाटन राजमाता आई जिजाऊ,त्यागमूर्ती माता रमाई,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांनी केले.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महिला राष्ट्रवादी काँग्रेसचा जिल्हाध्यक्ष रंजना पारशिवे आणि प्रमुख अतिथी म्हणून महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्ष अर्चना बुटले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मूल शहर अध्यक्ष आकाश येसनकर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रोहित कामडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला नेत्या सोनाली पोटवार,ओबीसी आघाडीचे तालुका अध्यक्ष वासुदेव पिपरे,महेंद्र गोंगले,प्रशांत मेश्राम उपस्थित होते.उपस्थित महिलांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका पदाधिकाऱ्यांनी हळदी कुंकू लावून भेट वस्तू भेट दिल्या.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांनी महिलांना मार्गदर्शन करताना शासनाच्या योजनाच्या माध्यमातुन स्वतःचा आर्थिक सामाजिक विकास साधावा. अडचन आल्यास आम्ही आपल्या पाठीशी राहू असा शब्द दिला.यावेळी रजना पारशिवे यांनी सुद्धा महिलांना अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुल तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांनी उपस्थित महिलांना आवाहन करताना तुम्हाला अडचणी आल्यास फक्त या भावाची आठवण करा मी तुमच्या पाठीशी राहून समस्या सोडविण्याचा पुरेपूर प्रयत्न करेन असा शब्द दिला.मेळाव्याचे प्रास्ताविक महिला तालुका अध्यक्ष संगीता गेडाम यांनी तर आभार आणी संचालन शहर अध्यक्ष धाराताई मेश्राम यांनी केले.







# प्रकाश नगर मित्र परिवारच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते उद्घाटन

## श्री राम प्राणप्रतिष्ठापणा निमित्त विविध धार्मीक सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्री रामलल्ला प्राणप्रतिष्ठापणा निमित्त प्रकाश नगर मित्र परिवारच्या वतीने विविध सामाजिक आणि सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी येथील रक्तदान शिबिराचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.यावेळी धनजंय यादव,सदाशिव साहु, आकाश देवांगन, रुपेश निर्मलकर, राजू देवांगण, अनुज देवांगण, पवन ठाकुर, युवराज यादव, तोरण साहुजी, हरबन्स, संतोष सिन्हा, किष्णा गुप्ता, जितेंद्र सेन, पुसवू, टेकराम देवांगण, मन्नू पोती, मोनु यादव, आदींची उपस्थितीहोती.



प्रभु श्री रामलल्ला च्या प्राणप्रतिष्ठापणे निमित्त चंद्रपूरात विविध धार्मीक आणि सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील प्रकाश नगर येथे या निमित्त भजन, महाप्रसाद, रक्तदान शिबिर आणि स्मृती चिन्हांच्या लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते सदर कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. आज देशासाठी गौरवाचा दिवस आहे. चंद्रपूरातही नागरिकांनी स्वयंपुढाकार घेत विविध ठिकाणी धार्मीक कार्यक्रम आयोजित केले. आपणही यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने गांधी चौक येथे ११ प्रकारच्या भातांचा महाप्रसाद वितरित केला असे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. प्रकाश नगर येथील नागरिकांनी उत्तम असे आयोजन केल्या बदल यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी आयोजकांचे कौतूक केले. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# २ फेब्रुवारीपासून चंद्रपुरात तीन दिवस जाणता राजा

## चांदा क्लब ग्राउंडवर रंगणार महानाट्य

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शिवछत्रपतींच्या जन्मापासून राज्याभिषेकापर्यंतच्या रोमांचकारी प्रसंगांना साकारणारे आशिया खंडातील सर्वात मोठे महानाट्य'जाणता राजा'चंद्रपूरकरांच्या भेटीला येत आहे. राज्याचा सांस्कृतिक विभाग,जिल्हा प्रशासन व चंद्रपूर महानगरपालिका मार्फत या महानाट्याचे आयोजन करण्यात आले असून २,३,व ४ फेब्रुवारी २०२४ रोजी चांदा क्लब ग्राउंड,चंद्रपूर येथे प्रयोग होणार आहेत.



जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये या संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार,महानगरपालिका आयुक्त विपिन पालीवाल,उपायुक्त मंगेश खवले,विशेष कार्य अधिकारी डॉ. विजय इंगोले,उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे,मुख्याधिकारी विशाल वाघ,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे,शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे आदी उपस्थित होते.राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार पद्मविभूषण इतिहासकार बाबासाहेब पुरंदरे लिखित व दिग्दर्शित केलेला हा प्रयोग चांदा क्लब ग्राउंड,चंद्रपूर येथे हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने फिरत्या रंगमंचावर रंगणार आहे. यासाठी प्रवेशिका असेल,मात्र प्रवेश मोफत ठेवण्यात आला आहे.

दररोज सायंकाळी ६ वाजता या प्रयोगाला सुरुवात होईल. उंट,घोडे यांचा वापर आणि शिवरायांच्या काळातील सर्व रोमांचक घटनाक्रमाचे जिवंत चित्रण २०० च्या वर कलाकार करणार आहेत.

# मराठा सर्व्हेक्षणासाठी ४८१ कर्मचाऱ्याची नियुक्ती–तहसीलदार मदन जाधव

**मंगळवेढा :** राज्य मागासवर्ग आयोग व राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे शहरासह तालुक्यात मराठा सर्व्हेक्षण बाबत विशेष मोहीम राबविण्यात येणार असून त्यासाठी तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, शिक्षकासह ४४७ प्रगणक व ३४ पर्यवेक्षकाची नेमणूक करण्यात आल्याची माहिती तहसीलदार मदन जाधव यांनी दिली.राज्यातील मराठा समाजातील सर्व कुटुंबाचे प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करून समाजाची अचूक माहिती मिळावी या दृष्टिकोनातून राज्य मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून २३ ते ३१ जानेवारी दरम्यान प्रत्येक गावात मराठा सर्व्हेक्षण बाबत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून २० जानेवारी रोजी जिल्हा स्तरावर तर २१ जानेवारी रोजी तालुका स्तरावर प्रगणक व पर्यवेक्षक यांच्यासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदरचे संपूर्ण सर्व्हेक्षण हे मोबाईल अँप च्या माध्यमातून केले जाणार असून त्यामुळे मिळणारी माहिती तात्काळ राज्य मागासवर्ग आयोगाला समजण्यास मदत होणार आहे.तालुक्यातील सर्व प्रगणक यांना गाव व वॉर्ड नेमून देण्यात आले असून त्या वॉर्डातील सर्व घरांमध्ये जाऊन सर्व्हेक्षण करावे लागणार आहे. सर्व प्रगणक यांना आयोगाच्या वतीने ओळखपत्र देण्यात आले आहे. सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रगणक यांना संबंधित घरावर मार्कर पेनने गोल काढून त्यामध्ये चडइउउ हा शब्द लिहावा लागणार आहे. यामध्ये नागरिकांना पुरावा म्हणून कोणतेही कागदपत्रे देण्याची आवश्यकता नसून फक्त अँप मधील प्रश्नांची उत्तरे द्यायची आहेत.अँप मध्ये मूलभूत माहिती, आर्थिक माहिती, कौटुंबिक माहिती, सामाजिक माहिती, आरोग्य विषयक माहिती अशा एकूण पाच भागात प्रश्नावलीची विभागणी करण्यात आली असून १८० पेक्षा जास्त प्रश्न असणार आहेत. हे प्रश्न फक्त मराठा किंवा खुल्या प्रवर्गातील कुटूंबासाठी असून सर्व्हेक्षण करताना यापूर्वीच आरक्षणाचा लाभ मिळत असलेल्या कुटुंब आढळल्यास त्यांचा सर्व्हे पहिल्या दोन प्रश्नातच पूर्ण होणार आहे. रोज होणाऱ्या सर्व्हेक्षणाची माहिती तहसील स्तरावर सुद्धा पहावयास मिळणार आहे.तालुका स्तरावर तहसीलदार यांना नोडल अधिकारी तर मुख्याधिकारी यांना सहायक नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे.तहसील स्तरावर निवासी नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगिरे यांच्या अध्यक्षतेखाली नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून त्यात पाच कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली.मराठा सर्व्हेक्षण मोहिमेच्या अनुषंगाने दिनांक २३ ते ३१ जानेवारी दरम्यान राज्य मागासवर्ग आयोगाने नेमलेले प्रगणक तालुक्यातील सर्व कुटुंबांना भेट देणार असून त्यांना सहकार्य करण्याचे व प्रश्नावली मधील इत्यंभूत माहिती द्यावी.

# सोलापूर, पुणे, नगर, धाराशिवची वरदायिनी उजनी धरण मायनसमध्ये

**सोलापूर :** सोलापूरसह पुणे (इंदापूर व बारामती), नगर, धाराशिव या शहरांसाठी वरदायिनी असलेल्या उजनीतील पाणीसाठा आज रविवारी (ता. २१) सायंकाळी साडेसहा वाजता उणे झाला आहे. पावसाळ्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने दहा वर्षानंतर अशी परिस्थिती पहिल्यांदाच निर्माण झाली आहे. धरणातील साठा ६० टक्के उणे झाल्यानंतर उजनीवरील बहुतेक पाणीपुरवठा योजना बंद पडतात, त्यामुळे आता प्रशासनाला पाण्याचे ठोस नियोजन करावे लागणार आहे.सोलापूर जिल्ह्यातील सर्वच एमआयडीसींना तर पुणे जिल्ह्यातील काही एमआयडीसींना उजनीतूनच पाणीपुरवठा होतो. कर्जत– जामखेड, धाराशिव, सोलापूर, इंदापूर, बारामती शहरासह सोलापूर जिल्ह्यातील १००हून अधिक ग्रामपंचायती व नगरपालिकांचा पाणीपुरवठा उजनीवरच अवलंबून आहे. सोलापूर जिल्ह्यातील जवळपास पावणेदोन लाख हेक्टर जमीन उजनीमुळे सिंचनाखाली आली आहे.सोलापूर जिल्ह्यातील



साखर कारखानदारीला उजनीचा मोठा आधार आहे. आता जानेवारीतच उजनी धरण मायनस झाल्याने आगामी साखर हंगामावर त्याचा विपरीत परिणाम होणार हे निश्चित. पुढच्या वर्षी सुपर अलनिनो वादळामुळे पावसाळा काही दिवस लांबणीवर पडू शकतो, असा हवामान खात्याचा पूर्वीचाच अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाला उजनीतील पाण्याचे काटेकोर नियोजन करावे लागेल, अन्यथा पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होवू शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.

# चारठाणा येथे २२ कोटींच्या जल जिवन मिशन पाणी पुरवठा योजनेचा उदघाटन सोहळा संपन्न

## आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती

**चारठाणा** –आज २३जानेवारी रोजी चारठाणा येथे बावीस कोटी रुपयांच्या जलजीवन मिशन योजने अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेचा भुमिपूजन सोहळा आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.जलजीवन मिशन योजनेमध्ये येलदरी धरणावरून पाणी पुरवठा पाईप लाईन, गावामध्ये दोन ठिकाणी बालाजी नगर मध्ये एक पाण्याची टाकी व नवीन सेवालाल नगरमध्ये एक नवीन पाण्याची टाकी उभारण्यात येणार आहे.

यासोबतच पाणी फिल्टर करण्यासाठी नवीन जल शुद्धीकरण यंत्र देखील उभारण्यात येणार आहे. या योजनेमुळे चारठाणा गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे. उदघाटनपर बोलतांना आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी असे सांगितले की चारठाणा गावाच्या विकासासाठी मी कोठेही कमी पडणार नाही. प्रादेशिक पर्यटन योजने अंतर्गत रोड आणि नालिसाठी पन्नास लक्ष रुपये, शाळा खोली बांधकामासाठी पंचेचाळीस लक्ष रुपये, ठक्कर बाप्पा योजनेमधून चौदा लक्ष रुपये आपण विविध विकास कामांसाठी मंजूर केले असुन लगेच या कामांचा शुभारंभ करण्यात येणार आहे.यासोबत वैयक्तिक लाभ योजनेतून ८० सिंचन विहीर, विश्वकर्मा योजनेतून १५० लाभार्थी, मोदी आवास घरकुल योजनेतून ३०० घरकुल, अल्पसंख्यांक योजनेतून १५० घरकुल, रमाई आवास योजनेतून ७० घरकुल, यशवंतराव चव्हाण योजनेतून ८० घरकुलांना लवकरच मंजुरी मिळणार असुन, श्रावण बाळ निराधार योजनेतून ३५ लाभार्थ्यांना आपण लाभ मिळवून दिला आहे व शासनाच्या विविध योजने मधून आपण अनेक विकास कामे शासनाकडे प्रास्तावित केले असुन लवकरच या कामांना मंजुरी मिळणार असल्याचे



सांगितले. जलजीवन मिशन पाणी पुरवठा योजनेच्या भूमिपूजन प्रसंगी आमदार मेघना साकोरे बोर्डीकर, भाजपा तालुकाध्यक्ष ऍड.विनोद राठोड, महिला तालुकाध्यक्षा संगीता जाधव, शहराध्यक्षा पुनम तमशेटे, सरपंच अनिरुद्ध चव्हाण, उप अभियंता घुगे साहेब, कनिष्ठ अभियंता आष्टीकर साहेब, भाजपा युवानेते इंद्रजीत घाटुळ, तातेराव चव्हान, अल्पसंख्यांक मोर्चा जिल्हाध्यक्ष मतीन तांबोळी, तालुका उपाध्यक्ष सुभाष पवार, सरचिटणीस शिवशंकर तमशेटे, ग्रामपंचायत सदस्य दौलतराव देशमुख, सय्यद खलील, गणेश पारवे, सय्यद रहेमत, वाजेद कुरेशी, अलिमोद्दीन काझी, कैलास महाराज देशमुख, बाळासाहेब देशमुख, सतीश देशमुख, किरण काका देशमुख, पुरुषोत्तम भाऊ देशमुख, जगदीश महाराज देशमुख, सय्यद तालेब अली, सुरेश काका देशपांडे, दीपक भाग्यवंत, कृष्णा सोनटक्के, इब्राहिम भाई, संदीप भवरे, किरण निकाळजे, सूर्यकांत निकाळजे, अमोल भवरे, अण्णासाहेब मुळे, बालाजी कटारे, अशोक राठोड यांच्यासहपत्रकार बंधू मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती.

# जिल्हा कृषि महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), कृषी विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोनती अभियान (उमेद), महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), आणि नाबार्ड यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हा कृषी महोत्सव २०२३-२४ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २३ जानेवारी रोजी उद्घाटन समारोह पार पाडला.उद्घाटन खासदार अशोक नेते यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी आमदार डॉ. देवराव होळी, आमदार कृष्णा गजबे, भाजपा जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्ष गिता हिंगे, अतिरीक्त जिल्हाधिकारी धनाजी पाटील, आत्माचे प्रकल्प संचालक पंढरी डाखळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी बसवराज मास्तोळी, ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रशांत शिर्के, माविम जिल्हा समन्वयक विष्णुपंत झाडे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. माया राऊत, वरिष्ठ शाखज्ञ तथा कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. संदिप कऱ्हाळे, नाबार्ड जिल्हा विकास व्यवस्थापक एन.व्ही. पौनिकर हे उपस्थित होते.उद्घाटनीय भाषणात खा. अशोक नेते यांनी सर्वांना नवीन वर्षाच्या व मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. कृषि महोत्सवाचा उद्देश केंद्र व राज्य शासनाच्या विवीध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे आहे असे सांगितले. तसेच तालुकानिहाय शिबीर व बैठका घेऊन शेतक-यांपर्यत विवीध योजनांचा लाभ मिळवुन देण्याचे विवीध विभागांना सुचना केली. केंद्र व राज्य शासनामार्फत शेतक-यांसाठी राबविण्यात येणा-या योजना प्रधानमंत्री पिक विमा योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना इ. योजनांची माहिती दिली. तसेच शेती सोबतच पुरक व्यवसाय करुन आपले उत्पन्न दुप्पट करण्याचे आवाहन शेतक-यांना केले.आ. डॉ. देवराव होळी यांनी कृषी महोत्सवाच्या माध्यमातुन नवीन तंत्रज्ञानाचे प्रदर्शन होते ते शेतकऱ्यांनी आत्मसात करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे असे सांगितले. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येक शेतकरी, महिला व गावांचा विकास करण्यासाठी विवीध योजनांच्या माध्यमातुन कार्य सुरु आहे असे सांगितले.आ. कृष्णा गजबे यांनी कृषि महोत्सव कार्यक्रमात ज्या कर्मचारी व शेतक-यांचा सत्कार झाला त्यांचे अभिनंदन केले. गडचिरोली जिल्ह्यात ज्या शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झाल्या आहेत त्यांचे सक्षमीकरण करणे व त्यांना विवीध योजना उपलब्ध करुन त्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे असे



सांगितले. तसेच शेतक-यांनी नैसर्गिक पध्दतीने शेती करण्याचे आदान केले. तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान योजना अंतर्गत लाभार्थी शेतक-यांनी इबकायच. (आय बि केवायसी ) करुन घेण्याचे आवाहन केले.अतिरीक्त जिल्हाधिकारी धनाजी पाटील यांनी जास्तीत जास्त संख्येने शेतक-यांनी कृषि प्रदर्शनाला भेट देऊन कार्यक्रमात आयोजीत मार्गदर्शन कार्यशाळांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच मनरेगा अंतर्गत विवीध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.सदर कार्यक्रमाची प्रस्तावना प्रकल्प संचालक पंढरी डाखळे यांनी केली. प्रस्तावनेत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांनी पिकविलेला शेतमाल पडेल किमतीत मध्यस्था किंवा व्यापाऱ्यांना विकवा लागतो. तोच माल ग्राहकांना मात्र चढ्या दरात खरेदी करावा लागतो. शेतकरी आणि ग्राहक दोघांचेही हित साधण्याच्या दृष्टीने कृषी, धान्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे असे सांगितले.प्रसंगी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी बसवराज मास्तोळी, प्रशांत शिर्के, विष्णुपंत झाडे, डॉ. संदिप कन्हाळे, एन.व्ही. पौनिकर यांनी कार्यक्रमास उपस्थित शेतकरी व महिलांना मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन आवासाहेब धापते यांनी केले. कार्यक्रम प्रसंगी मोठ्या संखेने शेतकरी व महिला, विवीध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर कृषि महोत्सवाचे आयोजन २३ ते २७ जानेवारी २०२४ दरम्यान करण्यात आलेले आहे, तरी सदर कार्यक्रमास शेतकरी, महिला, स्थानीक नागरीक यांनी भेट देऊन लाभ घेण्याचे आवाहन प्रकल्प संचालक, आत्मा, यांनी केले आहे.

# अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, माणिकगड तर्फे पल्लेझरी येथे मोफत आरोग्य शिबीर

**राजुरा । प्रतिनिधी**




अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, माणिकगढ आपल्या सामाजिक जबाबदारीच्या उपक्रमांद्वारे विविध उपक्रम राबवते, ज्यात गावातील लोकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले जाते. हे लक्षात घेऊन धन्वंतरी प्रकल्पांतर्गत एका मागून एक असे मोफत आरोग्य शिबीर जीवती तालुक्यातील वेगवेगळ्या गावात राबविल्या जात आहे.

दिनांक २३ जानेवारीला जिवती तहसील येथील ग्रामपंचायत पल्लेझरी येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन सी.एस. आर. अंतर्गत केले. एकूण १७० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला यामध्ये गावातील पुरुष, महिला, वृद्ध व शालेय विद्यार्थ्यांची तपासणी करून औषध वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यासाठी अल्ट्राटेक,माणिकगढ चे ई. आर. हेड नवीन कौशिक , धुरपताबाई बापुजी सीडाम सरपंच, लाला फजानीया शेख उपसरपंच ,घोडमारे सचिव मरकागोंदी ,डॉक्टर सुरज सोळंके वैद्यकीय अधिकारी टाटा कॅन्सर केअर चंद्रपूर , डॉक्टर ट्विन्कल डेंगळे, डॉक्टर रूपाली यादव ,प्रवीण कडू, बुचे मुख्याध्यापक, कमलाबाई नागोराव मडावी ग्रामपंचायत सदस्य, ललिता माणिक मेश्राम ग्रामपंचायत सदस्य, बापूजी शिडाम प्रतिष्ठित नागरिक अनिल गुलाबराव आंबटकर सहाय्यक शिक्षक, काजल मते (सी एच ओ )नंदपा यशोदा राठोड (एच ए )पाटण ए के यमलेल (ए एन एम) नंदप्पा नताशा देऊरकर स्टाफ नर्स, काजल विश्वास स्टाफ नर्स, वैष्णवी सहारे (डी इ ओ) सुरेखा रामचंद्र गायकवाड आशा वर्कर पल्लेझरीसरपंच व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. या शिबिरात तोंडाच्या, गर्भाशयाच्या व स्तनाच्या कर्करोगाची तपासणी टाटा कॅन्सर केयर फौंडेशन च्या टीम कडून करण्यात आली . तसेच प्रा. आ. केंद्र पाटण येथील पथकद्वारे बीपी आणि शुगर ची चाचणी करण्यात आली.या आरोग्य शिबिराला यशस्वी करण्यासाठी अल्ट्राटेक सिमेंट, माणिकगड येथील डॉक्टरांच्या टीमने आणि सी. एस. आर. टीम ने अथक परिश्रम घेऊन हे शिबीर यशस्वी केले.या शिबिरादरम्यान नवीन कौशिक यांनी गावातील नागरिकाच्या आरोग्य बद्दल जाणून घेतले. या शिबिराचे आयोजन केल्याबद्दल सरपंच,उपसरपंच व ग्रामस्थांनी माणिकगड युनिटचे आभार मानले.

# ग्रामगीता महाविद्यालयात स्नेहसंमेलन

**चिमूर । प्रतिनिधी**

दिनांक १६ जानेवारी ते २० जानेवारी २०२४ या कालावधीत ग्रामगीता महाविद्यालय चिमूर येथे वार्षिक स्नेहसंमेलना प्रित्यर्थ क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव तसेच ऋयुवास्पंदन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . दिनांक १६, १७ व १८ जानेवारी रोजी कबड्डी, क्रिकेट, व्हॉलीबॉल, रनिंग पुष्परचना, रंगोली, पोस्टर, डिश डेकोरेशन, आनंद मेळावा अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या .दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी शहीद बालाजी रायपुरकर सभागृहात ऋयुवास्पंदन' वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमिर धमानी व उद्घाटक म्हणून मनोज गभने, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चिमूर उपस्थित होते. प्रमुख अतिथी आणि उद्घाटक म्हणून उपस्थित असलेले माननीय मनोज गभने यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी भविष्यात यश संपादन करावयाचे असेल तर प्रत्येकाने आपले शील राखून नैतिकदृष्ट्या प्रामाणिक प्रयत्न करणे महत्त्वाचे असते असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमात विद्यार्थ्यां साठी गीत गायन, बचाव स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, प्रश्नमंजुषा,




नृत्य व नाटक स्पर्धा अशा अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते शेवटच्या दिवशी दिनांक २० जानेवारी रोजी विविध स्पर्धे अंतर्गत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करून सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या समारोपिय कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. अमीर धमानी व प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजेश डहारे, कार्यकारी प्राचार्य सर्वोदय महाविद्यालय शिंदेवाही, डॉ. जी. डी. देशमुख, कार्यकारी प्राचार्य राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय, नागभीड तसेच सांस्कृतिक संमेलन प्रमुख प्रा. डॉ. मृणाल वऱ्हाडे, क्रीडा प्रमुख प्रा. डॉ. संदीप सातव, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. वरदा खट्टी मॅडम, नॅक समन्वयक प्रा. डॉ. निलेश ठवकर उपस्थित होते.कार्यक्रमात प्रथमता सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यासाठी त्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष आणि प्रमुख अतिथी चे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. समारोपीय कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्रज्ञा खोब्रागडे, प्रास्ताविक प्रा. डॉ. सुमेध वावरे व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. मृणाल वऱ्हाडे यांनी केलेत. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देऊन करण्यात आली. कार्यक्रमाचे यशस्वीतेकरिता प्रा. हुमेश्वर आनंदे, प्रा. संदीप मेश्राम, प्रा. विवेक माणिक, प्रा. अरुण पिसे, प्रा. डॉ. युवराज बोधे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी आणि परिसरातील गावकरी सुद्धा उपस्थित होते.

# अखील भारतीय कबड्डी स्पर्धेचा थाटात समारोप

## पुरुष गटात हरीयाणा तर महिला गटात मुंबई ला विजेतेपद

**वरोरा । प्रतिनिधी**

जयहिंद क्रिडा मंडळ, वरोरा द्वारा आयोजित अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेचा समारोप रविवार दि. २१ जानेवारी रोजी कॉटन मार्केट वरोरा येथे पार पडला. या स्पर्धेत पुरुष गटात हरियाणा राज्याचा संघ तर महीला गटात मुंबई येथील संघ अव्वल ठरला.

वरोरा येथे पार पडलेल्या अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेत देशभरातून अनेक संघातून हजेरी लावली होती. चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत अंतिम सामन्यात साई सोनिपत हरीयाणा या संघाने ठाणे महानगरपालिका, ठाणे या संघावर विजय मिळवला. तर मुर्तीजापूर संघाला पुरुष गटात तृतीय पारितोषिक मिळाले. महिला गटात मुंबई महानगरपालिका, मुंबई संघाने एमएच स्पोर्टिंग क्लब, पुणे या संघाचा पराभव करुन अव्वल स्थान प्राप्त केले. तर विदर्भ क्रिडा मंडळ, मोर्शी या संघाला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. पुरुष गटात विजेत्या ठरलेल्या साई सोनिपत हरियाणा संघाला एक लाख एक्कावन हजार रुपये रोख व चषक तर उपविजेत्या



ठरलेल्या ठाणे महानगरपालिका, ठाणे संघाला एक लाख रुपये रोख व चषक तसेच तृतीय पारितोषिक मिळालेल्या मुर्तीजापूर संघाला एक्कावन हजार रुपये रोख व चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच महिला गटात विजेता ठरलेल्या मुंबई महानगरपालिका, मुंबई संघाला एक लाख रुपये रोख व चषक तसेच उपविजेत्या ठरलेल्या एमएच स्पोर्टींग क्लब, पुणे संघाला एक्काहत्तर हजार रुपये रोख व चषक तसेच तृतीय विजेत्या ठरलेल्या विदर्भ क्रिडा मंडळ, मोर्शी या संघाला एक्कावन हजार रुपये रोख व चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत चेतन साहू हरियाणा याला उत्कृष्ट खेळाडू म्हणून बुलेट गाडी देण्यात आली. तर उत्कृष्ट चढाई बिल्ला(मुर्तीजापूर), उत्कृष्ट जंपर म्हणून आवेद पठाण (ठाणे), उत्कृष्ट पकड म्हणून ढोलू(हरियाणा) यांना वैयक्तीक पारितोषिके देण्यात आली. महिला गटात संजना भोई हिला उत्कृष्ट खेळाडू म्हणून इलेक्ट्रीक स्कुटर देऊन सन्मानीत करण्यात आले. तर पुजा पाटील हिला उत्कृष्ट चढाई, वैष्णवी मेश्राम हिला उत्कृष्ट जंपर तर राखी घानोडे हिला उत्कृष्ट पकड म्हणून सर्वांना पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.यावेळी मंचावर आमदार चषकाच्या आयोजिका आमदार प्रतिभाताई धानोरकर या सोबत आ. सुभाष धोटे, आ. किशोर जोरगेवार, माजी मंत्री माणिकराव ठाकरे, यवतमाळ जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष टिकाराम कोंगरे, महिला कॉंग्रेस च्या ग्रामीण जिल्हाध्यक्षा नम्रताताई ठेमस्कर, महिला काँग्रेसच्या शहराध्यक्षा चंदाताई वैरागडे, चित्राताई डांगे, अल्पसंख्यांक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सोहेल रजा, विलास टिपले, प्रशांत काळे, मिलिंद भोयर, सुरज गावंडे, प्रशांत भारती, शाकीर मलक, रमजान अली, मदिन कुरेशी, राजू चिकटे, प्रमोद मगरे, शुभम चिमुरकर,बसंत सिंह, मनोज चिचोलकर यासह काँग्रेस पक्षातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदर स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाकरीता जय हिंद क्रिडा मंडळाचे अध्यक्ष प्रविण काकडे, उपाध्यक्ष कासीफ खान व त्यांच्या चमुने अथक परिश्रम घेतले.

# २९ जानेवारी रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**चंद्रपूर**–जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करीअर सेंटर, चंद्रपूर आणि श्री.साई आय.टी.आय.,भद्रावती यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन २९ जानेवारी रोजी करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते पार पडणार आहे.जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रात असलेल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच नामांकित उद्योजकांचा थेट नोकरी इच्छुक उमेदवारांशी संपर्क करण्याच्या दृष्टीने मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. सदर मेळावा सोमवार, दि.२९ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता गुंडावार लॉन, भाजी मार्केट, विजासन रोड, भद्रावती येथे पार पडणार आहे. या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून ८५० पेक्षा जास्त पदे भरण्यात येणार असून विविध नामांकित कंपन्या सहभागी होणार आहे.रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याकरीता https://Rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करुन ऑनलाइन अप्लाय करावे.

नामांकित कंपन्यांचा सहभाग:सदर रोजगार मेळाव्यात सन्सूर इंडिया प्रा.लिमि.चंद्रपूर, जय महाराष्ट्र प्लेसमेंट सर्व्हिसेस, भारत पे प्रा. लिमि.,एस.बी.आय.लाईफ इन्शुरन्स, टॅलेंनसेतू प्रा. लिमि.,पुणे आदी कंपन्या या मेळाव्यात सहभागी होत आहे.

आवश्यक कागदपत्रे:मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांनी आधारकार्ड, शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती (कमीत कमी तीन प्रती) सोबत ठेवाव्यात. जिल्ह्यातील जास्तीत-जास्त बेरोजगार उमेदवारांनी रोजगार मेळाव्यात सहभागी होऊन लाभ घ्यावा.तसेच मेळाव्याच्या अधिक माहितीकरीता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या ०७१७२-२५२२९५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. असे मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त भैय्याजी येरमे यांनी कळविले आहे.

# शाळांमध्ये स्नेहसंमेलन आयोजित करणे गरजेचे–भाग्यश्री आत्राम

## भगवंतराव आश्रम शाळा राजाराम येथे स्नेहसंमेलन व क्रीडा स्पर्धेचे उदघाटन

**अहेरी । प्रतिनिधी**

आजचे युग हे स्पर्धेचे व तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या युगात टिकून राहण्यासाठी शिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे. कारण शिक्षणामुळे मानवाचा सर्वांगीण विकास घडुन येत असतो तर स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळतो. यामुळे आपल्या अंगी असलेल्या कला प्रदर्शित करण्याची संधी त्यांना प्राप्त होतो. म्हणून शाळांमध्ये स्नेहसंमेलन आयोजित करणे गरजेचे असल्याचे मत माजी जि प अध्यक्ष तथा भगवंतराव मेमोरियल शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्री आत्राम यांनी व्यक्त केले.भगवंतराव मेमोरियल शिक्षण संस्था द्वारा संचालित भगवंतराव प्राथमिक तथा माध्यमिक आश्रम शाळा राजाराम (खां) येथे स्नेहसंमेलन व क्रीडा स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून येथील सरपंच मंगला आत्राम, ग्रा.प.सदस्य विनायक आलम, खांदलाचे उपसरपंच राकेश सिडाम, सामाजिक कार्यकर्ते तिरुपती कुळमेथे,शारदा आलाम, विजय अंबिलपवार,सत्यवान आलाम,अनिता आलाम,जयराम आत्राम, मुख्याध्यापक एम.व्ही.बासनवार तसेच सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.पुढे बोलताना विद्यार्थ्यांनी निव्वळ पुस्तकी ज्ञानापुरता मर्यादित न राहता आपल्या शालेय जीवनातच सामाजिक, सांस्कृतिक,राजकीय व आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे. कारण विद्यार्थीच उद्याचे भविष्य आहेत आणि ही क्रांती आपल्याला घडवून आणायची असेल तर यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करावा असेही त्यांनी आवाहन केले.दरम्यान त्यांच्या हस्ते स्नेहसंमेलन व क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांसोबत व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभाग आनंद लुटला.तर,आश्रम शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांशी गप्पा मारली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक पी.आर.गोंडाने यांनी केले तर आभार मुख्याध्यापक एम व्ही बासनवार यांनी मांडले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .